By Email

# महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ / कालमर्यादा</u>
महत्वाचे

क्रमांक - संकीर्ण 1714/प्र.क्र.25/संगणक
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - 400 032
दिनांक - 28 ऑगस्ट, 2014.

प्रति,

1) विभागीय आयुक्त (सर्व)
2) जिल्हाधिकारी (सर्व)
3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
4) महानगरपालिका आयुक्त (सर्व)

**विषय - मा. पंतप्रधान यांचे दि. 05 सप्टेंबर, 2014 रोजी शिक्षक दिनानिमित्त <u>शालेय विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या भाषणाचे प्रसारण करणेबाबत.</u>**

उपरोक्त विषयप्रकरणी केंद्र शासनाचे मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे दि. 27/08/2014 चे अर्धशासकीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे, त्याचे कृपया अवलोकन करावे.

2. दि. 05 सप्टेंबर, 2014 रोजी होणाऱ्या शिक्षक दिना निमित्त मा. पंतप्रधान यांचे भाषण होणार असून सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण टिव्ही, इंटरनेट, रेडीओ इ. मार्फत सर्व शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे आदेश केंद्र शासनाने सदर पत्रान्वये दिलेले आहेत. यासंदर्भात दि. 28/08/2014 रोजी केंद्र शासनाने Video Conference घेऊन सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. सदर कार्यक्रमामध्ये सर्व शाळांनी तसेच सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होणे बंधनकारक असल्याचे केंद्र शासनाने Video Conference मध्ये निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याबाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

1) दिनांक 05 सप्टेंबर, 2014 रोजी दुपारी 3 ते 4.45 या वेळेत मा. पंतप्रधान यांचे शिक्षक दिनाचे भाषण होणार असुन सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण टेलीव्हीजन, इंटरनेट, रेडीओ, यांद्वारे करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या वेळेमध्ये राज्यातील सर्व शाळांनी (शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी) त्या शाळेमधील सर्व विद्यार्थी दिनांक 05 सप्टेंबर, 2014 रोजी 2.30 वाजता उपस्थित राहतील याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

2) मा. पंतप्रधान महोदयांचे भाषण टेलीव्हीजन वर प्रसारीत होणार असल्याने शाळेमध्ये असणाऱ्या TV संचासमोर विद्यार्थी बसण्याची कार्यवाही करावी.

3) शाळेमध्ये TV संच नसेल तर शाळा मुख्याध्यापक किंवा शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांचेकडे असणारा TV संच उसनवारी तत्वावर शाळेमध्ये कार्यक्रमाच्या वेळेस उपलब्ध करुन घ्यावा. त्याचप्रमाणे सर्व विद्यार्थी एका वेळेस TV वर कार्यक्रम पाहण्यास अडचण निर्माण होईल अशा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांमध्ये उसनवारी तत्वावर अधिक TV संच [illegible] यावे.

4) राज्यात असणाऱ्या सर्व व्यवस्थापनांच्या (उदा. अनुदानीत, विनाअनुदानीत व खाजगी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इ.) 1.04 लाख शाळांपैकी किती शाळांमध्ये TV संच

[illegible]

उपलब्ध असेल याची माहिती दि. 30.08.2014 रोजी सकाळी 11.00 पर्यंत पाठविण्याची कार्यवाही संचालक (प्राथमिक) आणि संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी करावी.

5) सदर कार्यक्रमाचे प्रक्षेपण इंटरनेटद्वारे सुध्दा होणार आहे. त्यामुळे ज्या शाळांमध्ये केंद्र शासनाची ICT योजना राबविण्यात येते अशा शाळांमध्ये पुरविण्यात आलेल्या प्रोजेक्टर्सचा वापर कार्यक्रमाच्या प्रसारणासाठी करण्यात यावा.

6) सदर कार्यक्रमाच्या वेळी विद्युत पुरवठा सुरु राहील याची दक्षता घेण्यात यावी. कार्यक्रमादरम्यान विद्युत बोर्डाचे वेळापत्रकाप्रमाणे लोडशेडींग असल्यास आवश्यकतेनुसार जनरेटरची व्यवस्था शाळा व्यवस्थापन समित्यांमार्फत करण्यात यावी.

7) सदर कार्यक्रम शाळास्तरावर पार पाडण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाची तसेच शाळा व्यवस्थापन समितीची राहील.

8) सदर कार्यक्रम पार पडल्यानंतर शाळेमधील विद्यार्थी पटसंख्या त्यापैकी कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थीसंख्या याची माहिती त्याच दिवशी (5 सप्टेंबर, 2014 रोजी) पाठविण्याची व्यवस्था करावी.

9) सदर कार्यक्रमाचे सनियंत्रण करण्यासाठी आयुक्त शिक्षण यांचे कार्यालयात शिक्षण सहसंचालक आणि दोन शिक्षण उपसंचालक यांचा कृतीगट स्थापन करण्यात येत आहे. त्यानुसार सदर कार्यक्रम कृती गटामार्फत देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

10) राज्यातील काही दुर्गम भागातील शाळांमध्ये TV संच उपलब्ध केला तरी प्रसारण दिसण्यास अडचणी असून त्यातील अशा शाळांमध्ये अपवादात्मक परिस्थितीत विद्यार्थ्यांपर्यंत रेडिओद्वारे प्रसारण करण्यात यावे.

11) उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत काही महाविद्यालयांचे National Knowledge Network सुविधा उपलब्ध आहे. सदर सुविधेचा लाभ कार्यक्रमाच्या प्रसारणासाठी घेण्यात यावा.

आपणांस कळविण्यात येत आहे की, आपण आपल्या कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन व्यवस्थितरित्या पार पाडण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

(अश्विनी भिडे)
सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

प्रत अग्रेषित कार्यवाहीसाठी -
1) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
2) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
3) सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
4) सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रत माहितीस्तव - 1) मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
2) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव

सकाळपाळीतील सर्व शाळा दुपारपाळीसोबत एकत्रित भरवून वरील आदेशानुसार कार्यवाही करावी.

2/09/14
Education Officer
Nagpur Municipal Corporation